# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping women in distress situation**

**Police Station** :- **Manora**

**Date of Good Work done** :- **07/05/2023**

**Brief of the work done :-**

अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेणाऱ्या आरोपीस सुरत येथून अटक ; पो.स्टे. मानोरा पोलीसांची कामगिरी.

## अल्पवयीन मुलीस पळवणारा पोलिसांच्या जाळ्यात

**मानोरा, ता. ७ :** पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या एका गावातील अल्पवयीन मुलीस फूस लावून पळवून नेणाऱ्या आरोपीस अटक करण्यात आली. आरोपीचे नाव सचिन देवचंद पवार (२४) असे आहे.

मानोरा तालुक्यातील एका गावातील बारावीत शिकणारी अल्पवयीन मुलगी १८ एप्रिलला मानोरा येथील कम्प्यूटर इन्स्टिट्यूटला जाण्यास दुचाकीने घरून गेली. मात्र ती परत न आल्यामुळे पीडित मुलीची आई व वहिनीसोबत मानोरा पोलीस स्टेशनला जाण्यासाठी घरून निघाल्या. त्यांना कुपटा येथील हाटेल जवळ दुचाकी दिसली मात्र मुलगी आढळून आली नाही. मानोरा येथे शोध घेतला असता मुलगी मिळून आली नसल्यामुळे सदर महिलेने मानोरा पोलीस स्टेशनला अज्ञात इसमाने मुलीस फूस लावून पळवून नेल्याची फिर्याद दाखल करून पोलिसांनी प्रकरण तपासात घेतले. सदर अल्पवयीन मुलगी व आरोपी गुजरात राज्यातील सुरत येथे असल्याची गुप्त माहिती येथील डिबी पथक यांना मिळाली. बुलडाणा जिल्ह्यातील घाटपुरी येथील एका इसमास सोबत घेऊन सुरत येथील पोलिस यांची मदत घेऊन ५ मे ला अल्पवयीन मुलगी व आरोपी यांना ताब्यात घेऊन मानोरा पोलिस स्टेशनला आणले.

बुलडाणा जिल्ह्यातील खामगाव तालुका घाटपुरी येथील आरोपी सचिन देवचंद पवार (२४) यांचे विरुद्ध पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आले. ही कामगिरी डिबी पथकाचे जमादार गणेश जाधव, मयुरेश तिवारी, बालाजी महले, बन्सी चव्हाण, सुनील नेमाने यांनी केली. पुढील तपास प्रभारी ठाणेदार महेश कुचेकर यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक सविता वड्डे करीत आहे.